पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - **०४**

**सभावृत्तांत**

दिनांक - **०२/०८/२०१९** वेळ - सकाळी **११.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **०२/०८/२०१९** रोजी सकाळी **११.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.अश्विनी भिमा बोबडे - **सभापती**
२. मा.घोलप कमल अनिल
३. मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे
४. मा.पवार मनिषा प्रमोद
५. मा.अनुराधा गणपत गोरखे
६. मा.काळे उषा दिलीप
७. मा.सुलक्षणा राजू धर

या शिवाय मा.लोणकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.जुंधारे- कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

----------

विषय क्र.४) सभा आयोजनाबाबत. – मा.सुलक्षणा धर, मा.अनुराधा गोरखे यांचा प्रस्ताव.
विषय क्र.५) प्रभाग क्र.१५ राम मंदिर उद्यानाचे नुतनीकरण करणे.- मा.मनिषा पवार , मा.कमल घोलप यांचा प्रस्ताव.

----------

अ) दिनांक **२१/०६/२०१९, ०५/०७/२०१९, १९/०७/२०१९** रोजी झालेल्या सभेचा (**कार्यपत्रिका क्रमांक ०२**) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) दिनांक **०५/०७/२०१९, १९/०७/२०१९** रोजी झालेल्या सभेचा (**कार्यपत्रिका क्रमांक ०३**) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**----------**

ठराव क्रमांक - ०५ विषय क्रमांक - ०१
दिनांक - ०२/०८/२०१९ विभाग – प्रशासन
सुचक : मा.उषा ढोरे अनुमोदक : मा.अनुराधा गोरखे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/४०८/२०१९ दि.२७/०५/२०१९

विषय – मा.अस्थिरोग तज्ञ अभिनामाचे पद सरळसेवा प्रवेशाने भरण्याकामी कर्मचारी निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्यास मान्यता मिळणेबाबत...

विषय क्र.१ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - ०६ विषय क्रमांक - ०२

दिनांक - ०२/०८/२०१९ विभाग – प्रशासन

सुचक : मा.कमल घोलप अनुमोदक : मा.मनिषा पवार

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/४०९/२०१९ दि.२७/०५/२०१९

विषय – ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी पदावर करावयाच्या पदोन्नतीस मान्यतामिळणेबाबत..

विषय क्र.२ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

--------

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक - ०७ विषय क्रमांक - ०३

दिनांक - ०२/०८/२०१९ विभाग – बी.आर.टी.एस

सुचक : मा.कमल घोलप अनुमोदक : मा.मनिषा पवार

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/बीआरटीएस/६४५/२०१९ दि.१९/०७/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

स्थापत्य बीआरटीएस विभागा मार्फत दापोडी-निगडी रस्त्यावर सीएमई दापोडी येथील चौकात सब-वे बांधणेचे काम निविदा क्र. मुख्यालय ७१-०१/२०१६-१७ अन्वये मे.कृष्णाई इन्फ्रा प्रा. लि. यांचे मार्फत पुर्ण करणेत आले आहे. सदरचे काम सुरु करताना सदर सबवे-चे रस्त्याची/बॉक्सची रुंदी यामध्ये काही तांत्रिक कारणान्वये बदल करावे लागले. त्यामुळे मुळ निविदेमध्ये विषयांकित काम पुर्ण करता आले नाही. त्यामुळे सद्यस्थितीत सदर सबवे वरील रस्त्याचे डांबरीकरण (DBM व BC), Anticarbonation Paint व रोड फर्निचर इ. बाबींचे काम करणे आवश्यक आहे. सदर बाबींच्या कामाची र.रु. २९,००,०००/- इतकी होत आहे. सद्यस्थितीत टेल्को रस्त्यावरील दुर्गानगर चौक ते नाशिक हायवे पर्यंतच्या रस्त्यावरीलविविध सेवा वाहिन्या टाकणेकरीता खोदलेले चर बुजविणे व फुटपाथची दुरुस्ती करणे हे काम निविदा क्र. २०/२-२०१८-१९ व निविदा र.रु.४,१६,८८,९८५/- मे.कृष्णाई इन्फ्रा प्रा.लि. चे काम स्थापत्य बीआरटीएस विभागा मार्फत चालू असून सदर (सन २०१८-१९) कामाचा दर १०.९९%इतका कमी आहे. सदर टेल्को रस्त्यावरील दुर्गानगर चौक ते नाशिक हायवे रस्त्यावरील विविध सेवा वाहिन्या टाकणेकरीता खोदलेले चर बुजविणे व फुटपाथ दुरुस्ती करणे रस्त्याचे कामाची बचती मधुन दापोडी-निगडी रस्त्यावर सीएमई दापोडी येथील चौकात सबवे बांधणे येथील (DBM व BC), Anticarbonation Paint व रोड फर्निचर इ. बाबीचे र.रु. २९,००,०००/- चे काम करता येऊ शकतील. वरील दोन्ही कामे एकाच ठेकेदार असलेने व त्यामधील कामांच्या बाबींनुसार सब-वेचे उर्वरीत काम टेल्को रस्त्यावरील कामातून करणे शक्य असलेने तसेच सबवेचे कामातील रस्त्याचा वापर सुरु करणेचे दृष्टीने वरील प्रमाणे कामातील जागेत बदल होणार आहे. सदरचे जागा बदलास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ०८ विषय क्रमांक - ०४

दिनांक - ०२/०८/२०१९

सुचक : मा.सुलक्षणा धर अनुमोदक : मा.अनुराधा गोरखे

संदर्भ – मा.सुलक्षणा धर , मा.अनुराधा गोरखे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.विधी समितीची पाक्षिक सभा यापुढे प्रत्येक महिन्याच पहिल्या व तिस-या शुक्रवारी सकाळी ११.३० वा. ऐवजी दुपारी ३.००वा. आयोजित करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ०९ विषय क्रमांक - ०५

दिनांक - ०२/०८/२०१९

सुचक : मा.मनिषा पवार अनुमोदक : मा.कमल घोलप

संदर्भ – मा.मनिषा पवार, मा.कमल घोलप यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.१५ राम मंदिर उद्यानाचे नुतनीकरणाचे कामकाज ( निविदा क्र.२१/०२८/२०१८-१९ ) अंतर्गत करण्यात येत असून सद्यस्थितीत सदर उद्यानासाठी मा.स्थानिक नगरसदस्य यांचे मागणीनुसार मोठया स्वरुपाचे काम काढावयाचे असून त्याची निविदा प्रक्रीया चालू आहे. तरी सद्यस्थितीत राम मंदिर उद्यानात कुठलेली काम करण्याची आवश्यकता नाही. तरी प्रभाग क्र.१५ मधील कबीर उद्यान, तुकाराम उद्यान, ज्ञानेश्वर उद्यान, माऊली उद्यान व इतर उद्यानात तातडीने किरकोळ दुरुस्तीचे काम करणेची आवश्यक आहे. तरी प्रभाग क्र.१५ मधील राम मंदिर उद्यानाचे नुतनीकरण करणेच्या कामांतर्गत प्रभाग क्र.१५ मधील इतर उद्यानातील कामे करणेस मान्यता देण्यात येत आहे.


सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(अश्विनी भिमा बोबडे)**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/३/कावि/२६१/२०१९
दिनांक : ०२/०८/२०१९



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.